**प्रकल्प प्रवर्तक मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), बी विंग, आहुरा सेंटर, पहिला मजला, महाकाली लेणी रस्ता, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३ महाराष्ट्र यांच्या होटगी सिमेंट वर्क्स, मुक्काम पोस्ट-होटगी स्टेशन आणि हिपळे या गावातील, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र येथे स्टँड अलोन (स्वतंत्र) ग्राईडिंग युनिटच्या सिमेंट उत्पादन विस्तारिकरण ४.० दशलक्ष टीपीए वरुन ७.० दशलक्ष टीपीए प्रकल्प उत्पादन प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), बी विंग, आहुरा सेंटर, पहिला मजला, महाकाली लेणी रस्ता, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३ महाराष्ट्र यांच्या होटगी सिमेंट वर्क्स, मुक्काम पोस्ट-होटगी स्टेशन आणि हिपळे या गावातील, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर, महाराष्ट्र येथे स्टँड अलोन (स्वतंत्र) ग्राईडिंग युनिटच्या सिमेंट उत्पादन विस्तारिकरण ४.० दशलक्ष टीपीए वरुन ७.० दशलक्ष टीपीए प्रकल्प उत्पादन प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर , २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. दादासाहेब कांबळे, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), बी विंग, आहुरा सेंटर, पहिला मजला, महाकाली लेणी रस्ता, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३ महाराष्ट्र यांच्या होटगी सिमेंट वर्क्स, मुक्काम पोस्ट-होटगी स्टेशन आणि हुपळे या गावातील, तालुका-दक्षिण सोलापूर, महाराष्ट्र येथे स्टँड अलोन (स्वतंत्र) ग्राईडिंग युनिटच्या सिमेंट उत्पादन विस्तारिकरण ४.० दशलक्ष टीपीए वरुन ७.० दशलक्ष टीपीए प्रकल्प उत्पादन प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी ( ब्राऊन फिल्ड प्रोजेक्ट) ३ (बी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १३-०८-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक १४-०८-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सोलापूर, यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी गुरुवार , दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी १२. ०० वाजता घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ७९/२०२३, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २३१११० -एफटीएस ००९५ दिनांक १०/११/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - सदस्य
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
जिल्हा - पुणे,

३) उप प्रादेशिक अधिकारी, - आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक संचार यात मराठीत व दैनिक वृत्तपत्र दिव्यमराठी यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक ३०-१०-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-दक्षिण सोलापूर, तालुका- दक्षिण सोलापूर,, जिल्हा- सोलापूर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- दक्षिण सोलापूर, तालुका- दक्षिण सोलापूर,, जिल्हा- सोलापूर,

[signature]

६) ग्रामपंचायत कार्यालय मौजे - हणमगाव, शिंगडगाव, हिपळे, औज, आहेरवाडी, होटगी स्टेशन, होटगी या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर,

७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३रा मजला, जोग सेंटर, जुना मुंबई-पुणे हायवे, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

१०) उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३,

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना ४४ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत व सोबत जोडण्यात आले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्पासाठी प्रस्तावित खर्च रुपये ३५०.० कोटी असून प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च - रुपये २५.० कोटी , तर आवर्ती खर्च - रुपये १.७५ कोटी प्रतिवर्ष आहे.



जाधव मोरे

सदरहू प्रकल्पासाठी बांधकाम टप्प्यात सुमारे ७०० कंत्राटी मनुष्यबळाची तर २० नियमित मनुष्यबळाची रोजगाराची संधी उपलब्ध होईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर १० नियमत मनुष्यबळाची तर ५० कंत्राटी मनुष्यबळाची गरज भासेल. त्यात प्रकल्प बाधित आणि स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू प्रक्ल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री जगन्नाथ गायकवाड, सरपंच, होटगी स्टेशन, तालुका-दक्षिण सोलापूर,जिल्हा-सोलापूरः-**

या तिस-या युनिटच्या विस्तारिकरणासाठी आमच्या ग्रामपंचायतीची कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. स्थानिक शेतक-यांना सदरहू कारखान्यामुळे होणा-या प्रदूषणाच्या त्रासाबाबत वेळोवेळी अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास व प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे आणि अल्ट्रा-टेक कंपनी यांना सादर केलेले आहेत.

तरी प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे व होत आहे, त्याबाबत कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यात यावी. याबाबत कंपनीने काही धोरण आखले असल्यास त्याची माहिती द्यावी.

त्याचप्रमाणे होटगी स्टेशन ग्रामपंचायत क्षेत्रात बरेच युवक बेकार आहेत. तरी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार येथील होटगी स्टेशन ग्रामपंचायत क्षेत्रातील तरुण-तरुणींना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी ही विनंती.

प्रकल्प पवर्तकांनी सीएसआर निधीतून शाळेस मदत, महिला सबलीकरण या विविध बाबींमध्ये मदत केलेली आहे. काही दिवसांपूर्वीच महिलांना शिलाई मशिन्स उपलब्ध करुन दिलेले आहे.

गावातील युवा पिढीची मोठी समस्या आहे. मी कळकळीची विनंती करतो की, प्रकल्पात स्थानिक युवक-युवतींना नोकरीची संधि देण्यात यावी.

प्रकल्पाने २०१५ व २०१८ च्या नविन नियमाप्रमाणे मुल्यांकन केल्यानुसार ग्रामपंचायत कर भरावा. प्रकल्प पूर्वी रुपये २७ लाख देत होते. तर ग्रामपंचायत नियमांप्रमाणे ४६ लाख रुपये भरणे आवश्यक होते. तो २०१८ पासून फरक भरणे आवश्यक आहे. तो प्रकल्पाने भरावा ही विनंती.

२) **श्री. भगवान शिवराम वावरे, अध्यक्ष, अल्ट्रा-टेक सिमेंट युनियन (लोककल्याण युनियन) - मी मौजे होटगी स्टेशन व मौजे हिपळे गावातील समस्या मांडत आहे.**

येथे १९९३ साली ही प्रकल्पाचे पहिले युनिट मौजे होटगी स्टेशन व मौजे हिपळे गावात सुरु झाले. २००८-०९ साली दुसरे युनिट व आता २०२३-२४ ला तिस-या युनिटची सुरवात होत आहे. १९९३-२०२३ पर्यत प्रकल्प परिसरातील शेतक-यांना कंपनीच्या प्रदूषणाचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. याबाबत

स्थानिकांनी कंपनीस, जिल्हाधिकारी कार्यालय, स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना वारंवार लेखी स्वरुपात तक्रारी करत आहेत.

तरी आपण परिसरातील शेतात डस्ट पडते की नाही त्यासाठी शासनाचा अधिकारी, म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी यांनी स्थानिक शेतकरी व ज्यांच्या तक्रारी आहेत, त्यांच्या शेतात प्रत्यक्ष पाहणी करावी. तसेच बाधित शेतक-यांना त्याची भरपाई देण्यात यावी. तसेच डस्ट न पडण्याची दक्षता कंपनीने घ्यावी.

जर विस्तारिकरण प्रकल्पात कंत्राटी ५० लोकांची गरज लागणार आहे. आमच्या होटगी स्टेशन ग्रामपंचायत व हिपळे क्षेत्रात बेरोजगार युवक आहेत. दहा लोक कायमस्वरुपी लागणार आहेत. तरी होटगी स्टेशन व हिपळे यांच्या वतीने विनंती आहे की, आमच्या परिसरातील युवक-युवतींना विस्तारिकरण प्रकल्पात शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन रोजगाराची संधि देण्यात यावी.

पुढे अजून विनंती आहे की, १९९३ पासून २०२३ पर्यंत अल्ट्राटेक सिमेंटचे होटगी ते करजगी रोडवर रेल्वेचे गेट आहे. प्रकल्पात दोन युनीट चालू आहेत. दिवसात ५-७ वेळा गेट बंद होते. एकदा गेट बंद केल्यानंतर परत उघडण्यास ४५ मिनिटे लागतात. त्यामुळे वाहतुक कोंडी होते. रुग्णवाहिका, बाळंतपणासाठी जाणा-या महिला, वृध्द व रुग्ण यांना विनाकारण वाहतुक कोडींचा त्रास होतो. तसेच कंपनीचा कच्चा माल व पक्का माल पाठविण्यासाठी गेट बंद करतात. होटगी स्टेशनला गावाचा बाजार भरतो. वाहतुक कोंडी होते. तरी आमची मागणी आहे की, तेथे आपत्कालिन गेट (Emergency Gate) आम्हांला उपलब्ध करुन देण्यात यावे. ४५-५० मिनिटे थांबावे लागल्याने रुग्णास वैदकीय उपचाराविना राहावे लागते. त्यामुळे रुग्णाचा मृत्यू होण्याची शक्यता जास्त आहे. तरी आक्सिमक गेट त्वरित पुरविण्यात यावे.

गेले दोन महिन्यांपूर्वी औज गावाजवळ मोठा अपघात झाला. त्यात स्थानिक ३-४ व्यक्तींचा मृत्यू झाला. परिसरात येथील सर्व सिमेंट प्रकल्प व सिध्देश्वर कारखाना यांची गावातून मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असते. स्थानिक माताभगिनी या भाजी विकण्यासाठी बसतात. तरी अल्ट्राटेक कंपनीने स्थानिकांना भाजीपाला विक्री करण्यासाठी भाजीविक्री मार्केट बांधून द्यावे. येथील ग्रामपंचायत त्यासाठी पर्यायी जागा देईल. तरी संभाव्य अपघात टाळण्यासाठी अल्ट्राटेक कंपनीने सहकार्य करावे ही विनंती.

३) **<u>श्री. सुभाष रामचंद्र पाटोळे, उपसरपंच, होटगी स्टेशन ग्रामपंचायत, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्प प्रवर्तक व गाव यांचे संबंध सर्व बाबतीत सलोख्याचे असणे प्रगतीच्या दृष्टीने गरजेचे आहे. कंपनीने सामाजिक उपक्रमाबाबत जे सहकार्य केले, त्याबद्दल अभिनंदन.

तरी कंपनीने संयुक्त पाहणी दौरा आयोजित करण्यात यावा. त्यामुळे शेतक-यांच्या अडचणींची कल्पना, किती डस्ट पटते, किती पिकांचे नुकसान झाले याचा संयुक्त अहवाल तयार करण्यात यावा. जे प्रदूषण बाधित शेतकरी आहेत, त्यांच्या भावना तीव्र आहेत आणि त्या योग्य आहेत. त्यांना त्वरित न्याय देणे आवश्यक आहे.

तसेच स्थानिकांना नोकरीची संधि देताना प्रथम प्रकल्पबाधित शेतक-यांना प्राधान्य देण्यात यावे व नंतर इतर स्थानिकांना संधि देण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना तेच तेच मुद्दे उपस्थित न करण्याची विनंती केली. त्याचप्रमाणे स्थानिकांना लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते नोंदवू शकतात ही सूचना केली.

४) **श्री. सुभाष लोखंडे, माजी उपसरपंच, होटगी स्टेशन ग्रामपंचायत, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-**

या दुष्काळी ग्रामीण भागात ही मल्टी-नॅशनल कंपनी सुरु होताना येथील स्थानिक युवक-युवतीना रोजगार मिळण्याची अपेक्षा ही स्थानिकांनी केलेली अपेक्षा ही योग्य आहे. कंपनीने सीआरएस निधिव्दारे शैक्षणिक, आरोग्य, महिला सबलीकरण याबाबत योग्य प्रकारे कार्यक्रम राबवून नेहमीच सहकार्य केलेले आहे. दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिनी अल्ट्राटेक कंपनीच्या माध्यमातूनच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत असते.

मात्र कंपनीच्या प्रदूषणाचा त्रास जो स्थानिक शेतकऱ्यांना होत आहे, त्यासाठी बैठकीत केलेल्या सूचनांप्रमाणे संयुक्त स्थळ पाहणी आणि बाधित शेतकऱ्यांच्या शेताच्या पीकांची पाहणी करण्यात येऊन त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

होटगी गाव ते होटगी स्टेशन हे २ ते २.५ कि.मी. अंतर आहे. तो जीवघेणा प्रवास आहे. आपले बरेच कामगार येत असतात. अक्षरशः मृत्युचे महातांडव आहे. येथील कंपन्या काही करोडो रुपयांचा कर हा शासनास भरत आहेत. तरी जिल्हाधिकारी कार्यालयातून रस्त्याबाबत त्वरित सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा आम्ही करत आहोत. यास स्थानिक ग्रामपंचायतसुध्दा जबाबदार आहे तरी रस्त्याबाबत शासन व कंपनी यांनी मार्ग काढावा.

कंपनीचे विस्तारीकरण, प्रगती होत आहे याचे स्वागत, मात्र त्याचवेळेस कंपनीत गेले २६-२७ वर्षे राबणा-या कामगारांना अगदी तुटपुंजे वेतन मिळते. तर कंपनी विस्तारिकरणाबरोबरच कामगारांना वेतनवाढही देण्यात यावी. त्यांचे प्रश्नही ज्वलंत आहेत.

विस्तारीकरणासाठी परिसरातील कुठलाच आक्षेप येणार नाही, मात्र कंपनीने डस्टमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना भरपाई द्यावी, कंपनीने गेले २-३ वर्षात अनेक सामाजीक उपक्रम राबविले आहेत. तरी स्थानिक शेतकऱ्यांना, कंपनीतील कामगारांना न्याय देण्यात यावा. तसेच महिला सबलीकरण योजनेत महिलांना त्यांच्या बचत गटासाठी एक महिला बचत गटभवन बांधून देण्यात यावे. कंपनीने नियोजित केलेल्या विस्तारिकरणास विरोध नाही, मात्र ज्यांना कंपनीच्या प्रदूषणाचा त्रास होत आहे, त्यांनी न्याय द्यावा व प्रकल्पात प्रथम बाधीत शेतक-यांना, मुलांना नोकरीत प्राधान्य देण्यात यावे व नंतर स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात यावी.

५) **<u>श्री. निसार अहमद कांबळे, माजी सरपंच,होटगी ग्रामपंचायत, विद्यामान ग्रामपंचायत सदस्यः-</u>**

येथे आतापर्यंत सर्व मुद्दे उपस्थित झालेले आहेत. मात्र आमच्या परिसराचा विकास होत नाही, त्याबाबत बोलायचे आहे. वार्ड क्रं. ४ मध्ये एक रुपयाचेही काम केलेले नाही. तसेच शाळेला जे भिंतीचे कुंपण टाकलेले आहे, त्या पायाची माती ही आत मैदानात टाकलेली आहे. तरी माती काढून मुरुम टाकण्याचे काम लवकरात लवकर सुरु झाले पाहिजे. २०१८ पासून फर्म हाऊस हे बंद झालेले आहे. ते चालू केलेले नाही. त्यासाठी संमत करण्यात आलेला ठरावसुध्दा बेकायदेशीर आहे. तरी नियमानुसार कर घेण्यात यावा. जो फरक आहे आणि जे मुल्यांकन झालेले आहे, त्याप्रमाणे कर भरण्यात यावा.

तसेच कंपनीने वार्ड क्रं.१,२,३ वर चांगली कामे केली, मात्र माझा वार्ड क्रं ४ हा सोडला आहे. आमच्या वार्डात झोपड्या आहेत. तरी आमच्या वार्डातही काम करण्यात यावे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही नविन मुद्दे असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. तसेच आपला मुद्दा हा थोडक्यात व्यक्त करण्यात यावा.

६) **<u>श्री. युवराज पंढरी जाधव, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

मी शेतकरी आहे. उपस्थितांनी बरेच मुद्दे सांगितले, त्यामुळे आम्हांला सांगण्याचे काहीही राहिलेले नाही. या प्रकल्पाच्या प्रदूषणाचा होटगी गावापेक्षा हिपळे गावाला भरपूर त्रास आहे. त्यामुळे आम्ही हिपळे गावाने आंदोलन केलेले आहे. कंपनीसमोर निदर्शने, मोर्चे काढले, त्याचप्रमाणे स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे बरेच लेखी निवेदने दिलेली आहेत. तरीही आमच्या तक्रारींची दखल घेण्यात आलेली नाही. या तिस-या युनिट विस्तारिकरणापासून आम्हांला फार मोठ्या आशा आहेत.

कंपनीस आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेली १४-१५ मुले आमच्या गावात आहेत. तरी रोजगाराची संधि देताना प्रथम प्राधान्य आमच्या हिपळे गावाला देण्यात यावे, नंतर होटगी गावातील तरुणांना संधि देण्यात यावी.

कंपनीच्या डस्टमुळे हिपळे गावातील शेतीचे नुकसान झालेले असून लोकांना विविध आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. तरी माझी मागणी आहे की, हिपळे गावाची पाहणी करण्यात येऊन प्रत्येक शेतातील विहिरींची पाहणी करण्यात यावी. गावातील लोकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. कंपनीने काही बाबतीत हिपळे गावास सहकार्य केलेले आहे.

पुढील आक्षेप आहे की, कंपनी प्रशासन स्थानिक लोकांना अपमानास्पद वागणूक देते. जर हिपळे गावाचा विचार करण्यात आला नाही, तर आम्हांला शेवटी आंदोलन व उपोषणाचा मार्ग स्विकारावा लागेल.

७) **<u>श्री. शिवाजी नारायण बिराजदार, राहणार-हिपळे तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

कंपनीला लागूनचे माझी लिंबूची बाग आहे. कंपनीच्या डस्टमुळे झाडाची शेंडेसुध्दा करपून गेलेली आहेत. कंपनीत तक्रार करण्यास आल्यास कंपनीचे सुरक्षा अधिकारी हे हाकलून लावतात, अत्यंत अपमानास्पद वागणूक देण्यात येते. आता लगेच येऊन शासन व मप्रनि मंडळाने माझ्या शेताची पाहणी करावी.

मी कंत्राटी काम करतो. तर कंत्राटी कामगारांना अत्यंत हीन वागणूक देतात. कंपनी प्रशासनातर्फे अत्यंत भेदभावाची वागणूक दिली जाते.

येथे आयोजक यांनी उपस्थितांना थोडक्यात आटोपशीर मुद्दे मांडण्याची सूचना केली.

८) **<u>श्री. बापू आबाजी वाघमोडे, राहणार-हिपळे,तालुका-दक्षिण सोलापूर,जिल्हा-सोलापूरः-</u>**

येथे उपस्थितांना जे मुद्दे मांडले, ते पूर्णपणे सत्य आहेत.

९) **<u>श्री. समर्थ दिलीप सुरवसे, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

मी शेतकरी आहे. जिल्हा लागूनच आमची शेती असून कंपनीच्या प्रदूषणाची २०१७ च्या अगोदरपासून तक्रारी मी जिल्हाधिकारी कार्यालय-सोलापूर, तहसीलदार, दक्षिण सोलापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास करत आहे. माझे आजोबासुध्दा तक्रार करत होते. शेतातील पीकांवर मोठ्या प्रमाणात डस्ट पडत आहे. गेल्या आठवडयातच परत निवेदन दिलेले आहे. तरी प्रदूषण नियंत्रण मंडळाने आम्हांला न्याय द्यावा. सोबत व्हिडिओ दाखवत आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. व्हिडीओ दाखवता येणार नाही.

त्यावेळी, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणी आहे, येथे व्हिडिओ दाखवता येणार नाही. जर आपले काही नुकसान झाले असेल त्यासाठी सदरहू व्हिडिओची सी.डी. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस सादर करण्यात यावी. तो बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येईल. त्याबरोबर बैठकीची सी.डी.सुध्दा असेल.

१०) **<u>श्री. सुनील बबन पाटील, पाटीलवस्ती, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

बिर्ला कंपनीलगतच आमची तीस लोकांची वस्ती आहे. साधारणतः शंभर लोक तेथे राहतो. आम्ही वारंवार तक्रारी करत असून गेटवर येतो. गेट बंद केलेले होते. माझी बहिण एम्ब्युलन्समध्ये होती, ती दाखवून गेट उघडण्याची विनंती वारंवार करत होतो. तर मला आरपीएफची धमकी दाखवत होते. पंतप्रधानांचा ताफाही जात असल्यास एम्ब्युलन्सलाही अडवत नाहीत. जर थोडासा विलंब झाला असता, तर रोगी दगावला असता, यास कोण जबाबदार राहिल? येथील स्थानिक आशा करतात की, जर कंपनीचे विस्तारिकरण होत आहे, तर आम्ही स्थानिक लोक कंपनीकडून प्रगतीची, विकासाची अपेक्षा करतो. मात्र प्रकल्पाचे काही अधिकारी फोनवरसुध्दा अपमानास्पद बोलतात. त्याचे कॉल रेकॉर्ड आमच्याकडे आहेत. प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही आमची लाईटची सोय केली जात नाही.

येथील रस्ता खराब आहे, त्यामुळे बऱ्याच कामगारांना येण्यास दोन मिनिटे वेळ झाल्यास त्याला घरी पाठविण्यात येते.

या प्रकल्प विस्तारिकरणास आमच्या शंभर लोकांची हरकत आहे. कंपनीने आपली पैशाची ताकद दाखवू नये. नाहीतर आम्हांला आमची ताकद दाखवावी लागेल. कंपनी प्रशासन सांगते की, आमच्याकडे तीन हजार ट्रक्सचा करार आहे. येथे स्थानिक लोक यांच्या वाहतुकीने मरतात.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, ही जनसुनावणी पर्यावरणविषयक असून प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाबाबत काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. आपल्याजवळील व्हिडिओचे सी.डी.त रुपांतर करण्यात येऊन त्या सी.डी. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस सादर करण्यात याव्यात. त्या भारत सरकारच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस बैठकीच्या इतिवृतासोबत सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य ते निर्णय घेईल.

११) <u>श्री. अविनाश नामदेव पाटीलं, पाटीलवस्ती, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>

मी २०१७ ला अर्ज केलेला होता, व व्हिडिओसुध्दा दाखविला होता. त्यावेळी कंपनीने ५,००० ते १०,००० रुपये नुकसानभरपाई देण्याची तयारी होती. नंतर काय झाले माहित नाही, अजूनही काहीही मिळालेले नाही.

प्रकल्पात किंकर म्हणजे काय याची माहित द्यावी. तसेच डस्ट पडल्याने शेती पिकत नाही. कंपनीने ग्रामपंचायत होटगी व हिपळे येथे सुधारणा केल्या तर त्यांनी शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी काय मदत केली?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, तुमच्या मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली असून आपण आपले लेखी निवेदन सादर करु शकतात.

१२) <u>श्री. मलिक्कार्जून रामचंद्र मव्हाळे, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर,जिल्हा-सोलापूरः-</u>

मी सधन शेतकरी आहे. आतापर्यंत उपस्थितांना सांगितलेली परिस्थिती ही सत्य परिस्थिती आहे. १९९३ पासून ही कंपनी कार्यरत असून आजूबाजूला मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असते. होटगी स्टेशन परिसरापर्यत सिमेंट पडते. सर्व होटगी स्टेशन, हिपळे परिसरातील शेतात सिमेंट पडत असते. ज्वारी, बाजरी, गहू, द्राक्षबागा, लिंबूच्या बागा यावर कंपनीतील डस्ट पडते. माजी स्वतःची दहा एकर बाग आहे. कंपनी अधिका-यांनी स्वतः भेट देऊन पाहणी करणे आवश्यक आहे. डस्ट लिंबावर, द्राक्षावर पडले की पूर्ण फळ नासते. तरी एक शासनाचे अधिकारी, मप्रनि मंडळाचे अधिकारी यांची एक समिती नेमून त्यांनी सर्व बाधित क्षेत्राची व सर्व बाधित शेतक-यांची शेती, विहिरी यांची तपासणी करावी. प्रति एकर नुकसानभरपाई ही देण्यात यावी. कंपनी त्यांच्या मलखेड युनिटला प्रति एकर नुकसान भरपाई देते, तर येथे का देत नाही? तरी बाधितांना योग्य नुकसानभरपाई ही देण्यात यावी.

सर्व होटगी व हिपळे गावक-यांकडून मागणी आहे की, येथे सिध्देश्वर हॉस्पिटलची सोय आहे. तर एवढया मोठ्या बिर्ला ग्रुपकडून हॉस्पिटलची सोय गरिबांसाठी होणे गरजेचे आहे. ती सर्वांची मागणी आहे. येथे जागा भरपूर आहे. एक अत्याधुनिक सुसज्ज असे मल्टी स्पेशॉलिटी हॉस्पिटल विकसित करण्यात यावे.

१३) <u>श्री. अरविंद प्रकाश ढोणे, राहणार-होटगी स्टेशन ग्रामपंचायत, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>

येथे सर्व बाधितांनी, बाधित शेतक-यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे खरे आहेत. प्रत्येकाने आपली तळमळ उपस्थित केलेली आहे. कंपनी प्रशासनाने विकासाची कामे केलेली आहेत. तर आमची विनंती आहे की, बाधित शेतक-यांसाठी एक वेगळी योजना असावी, त्यातून शेतक-यास पेन्शन, बाधित पीकांसाठी भरपाई ही मिळाली पाहिजे.

तसेच प्रकल्प परिसराच्या आरोग्याच्या समस्यांसाठी कंपनीकडून एक डॉक्टर नियुक्त करण्यात यावा आणि त्याने प्रत्येक आठवड्यात दोन वेळा प्रकल्प परिसरातील गावात जाऊन रुग्णांची तपासणी करावी. त्यांना वैदकीय सल्ला व औषधोपचार हे मोफत देण्यात यावेत. कंपनीने आतापर्यत भरपूर मदत केलेली आहे. जिल्हा परिषद शाळा, काही रस्ते हे चांगले झालेले आहेत. विस्तारिकरण होत आहे,त्याचा आनंद आहेच, पण सद्यस्थितीचा विचार करुन गेले अनेक वर्षे काम करणा-या कामगारांचे वेतन हे वाढले पाहिजे.

१४) **<u>श्री. पुंडलिक रामचंद्र तेंडे, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर,जिल्हा-सोलापूरः-</u>**

कंपनीच्या कंपाऊंडच्या बाजूला माझे चौदा एकर शेत आहे. त्या शेतात चार क्विंन्टल माल होत नाही. तर आम्ही काय खायचे? या प्रदूषणामुळे माझ्या वडिलांचे दोन्ही डोळे गेले व तो मरुन गेला. तसेच माझ्या कुटुंबाचेही दोन्ही डोळे या प्रदूषणामुळे गेले. मी शेतात काम करताना कंपनीच्या डस्टमुळे माझेही डोळे तसेच होत आहेत. आपण कंपनी फायद्यासाठी काढतात, तर त्यात आमच्या शेतक-यांचा काय फायदा आहे? मी कंपनीमुळे बाधित झाल्याने एवढे बोलत आहे. तुमच्या फायद्यासाठी कंपनीचे उत्पादन वाढवत आहेत, तर शेतक-यांचा काहीही फायदा नाही. कोणी सरकारी अधिकारी येणार असेल, तर पाणी मारून ठेवतात. तरी याबाबत उपाययोजना त्वरित करण्यात याव्यात, अन्यथा गेटसमोर मी आत्महत्या करीन.

१५) **<u>सौ. नागरबाई किसन माळी, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

माझ्या डोळ्याचे ऑपरेशन झालेले आहे. आम्ही शाळा शिकलो नाही, पण हिंमतीने काम करत आहोत. या प्रदूषणामुळे आमचे डोळे खराब होत आहेत. कंपनीच्या भिंतीला लागून शेत आहे. प्रदूषणामुळे शेतातील पीकांचे नुकसान होत आहे. पीक उत्पादन कमी झालेलें आहे. शेतातील भाजी आणली आहे ती दाखवते, कसे आम्ही खायचे. तरी प्रदूषण कमी करा. आमचे काय ते बघा, प्रदूषणामुळे सर्व भाजी, पीके खराब होतात, कोणी भाजी विकत घेत नाही. तर आम्ही कसे जगू? तर आमचे काय ते सांगा, नंतर तुमची कंपनी सुरु करा.

१६) **<u>सौ. वर्षाराणी अमरनाथ उकीडे, राहणार-हिपळे, तालुका-दक्षिण सोलापूर,जिल्हा-सोलापूरः-</u>**

बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांना नमस्कार. कंपनी प्रशासनाने आरोग्य, रस्ता दुरुस्ती याबाबत चांगले काम केले आहे. कंपनी आल्यापासून गावात खूपच सुधारणा झालेली आहे. शालेय साहित्य चांगल्याप्रकारे पुरविण्यात येत आहे. महिला सबलीकरणाचा कार्यक्रम योग्य प्रकारे राबविला जात आहे.

तरी महिला सबलीकरणासाठी ब्युटी पार्लर कोर्स, संगणक शिक्षण, शिवणकाम शिक्षण आमच्या गावातील महिलांना व मुलांमुलींनाही मिळाले पाहिजे. कंपनी सहकार्य करते, त्यापेक्षा जास्त सहकार्य कंपनीने गावास द्यावे. आमच्या गावातील मुलांना शाळेसाठी पायी जावे लागते, त्यासाठी त्यांना शाळेच्या बसची सोय करुन द्यावी. जुने हिपळे ते नवीन हिपळेपर्यत सोय व्हावी. महिलांना एकत्र येण्यास जागा नसल्याने आमची गैरसोय होते. तरी गावातील महिलांसाठी मोठा हॉल बांधून देण्यात यावा. तसेच गावातील लोकांनी बैठकीत जी गैरसोय व्यक्त केली, ती दूर करण्यात यावी. कंपनीचे विस्तारिकरण होत आहे, तसेच गावाचाही विकास करावा, गैरसोय दूर करण्यात याव्यात.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीमार्फत उपस्थितांना सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याची पुरेशी संधि देण्यात आलेली आहे. तरीही उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप हे सादर करावयाचे

असल्यास ते लेखी स्वरुपात सादर करु शकतात. त्यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना उपस्थित प्रश्न, आक्षेप यांवर एकत्रित उत्तर देण्याची सूचना केली.

<u>प्रकल्प प्रवर्तक यांनी एकत्रितपणे उत्तर देताना प्रथम सर्वांना धन्यवाद दिले.</u>

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, प्रकल्पासाठी जमिन दिली. त्यामुळे प्रकल्प बाधितांचा मागणी करण्याचा अधिकार आहे. बैठकीत ३-४ मुद्यांवर सूचना, आक्षेप नोंदविण्यात आले. सर्वांना प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त केली, ती रास्त आहे. काहींनी आक्षेप नोंदविला की, २०१५ मध्येसुध्दा तक्रार नोंदविली, अजुनपर्यंत त्याचे काहीही झालेले नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, आता अत्यंत आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उपलब्ध असून त्या प्रकल्पात स्थापित कराव्याच लागतात. आता नविन बॅग हाऊस ही प्रणाली आलेली आहे. पूर्वी चिमणीतून १५० मिलीग्रॅम धुर सोडण्याची परवानगी होती, आता फक्त ३० मिलीग्रॅम सोडण्याची परवानगी आहे. तरी महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार यांनी केलेली पारित मानके (prescribed standards) हे निश्चितपणे पाळण्यात येतील. किंबहुना पारित मानकांपेक्षा (prescribed standards) कमी प्रदूषण निःस्सारण आमच्या प्रकल्पातून होईल.

शेतीच्या प्रदूषणाबाबत चर्चा करण्यात आलेली असून ज्याबाजूस शेतीचे प्रदूषण होते, त्या बाजूस कॅटल लावण्यात येईल, जेणेकरुन प्रदूषण कमी करता येईल. तरी संबंधित शेतक-यांना, स्थानिकांना विश्वासात घेऊनच याबाबत पुढील कृती करण्यात येईल. प्रकल्प प्रशासनाचा दावा आहे की, येथे कमी प्रदूषण होते, कारण येथे सर्व माल रेल्वेने आणला जातो. एका उपस्थितांनी क्लिंकर काय आहे याबाबत विचारणा केली. तर आम्ही येथे सिमेंट बनविण्यासाठी जो कच्चा माल वापरतो, त्यात कुठलेही केमिकल नाही. चुनखडी जाळून त्याचे सिमेंट बनविण्यात येते. बैठकीत कोणीही प्रकल्प नको असे सांगितले नाही, तर ज्या त्रुटी/समस्या आहेत, त्या दूर करण्याची सूचना केलेली आहे.

क्लिंकर हे बाहेर नसते, सायलोमध्ये असते. आम्ही अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करणार आहोत. बॅग फिल्टर्स बसविण्यात येतील.

प्रकल्पात रोजगाराच्या संधिबाबत अनेकांनी प्रश्न विचारले. रोजगाराची उपलब्धता ही देशाची समस्या आहे. तर प्रकल्पाची गरज व शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करण्यात येईल, त्यातही प्रथम प्राधान्य प्रकल्प बाधित लोकांना व नंतर स्थानिकांना देण्यात येईल. प्रकल्पात सोलापूर जिल्ह्यातील ५०% लोकांना रोजगाराची संधि देण्यात आलेली आहे. येथे ८०% लोक हे येथील आहेत. तांत्रिक पदांवर बाहेरिल व्यक्तींची गरज भासते.

काही उपस्थितांनी रेल्वेगेटबाबत गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. त्याच्याशी कंपनी प्रशासन सहमत आहे. याबाबत रेल्वेचे काही नियम आहेत. तर स्थानिकांना बरोबर घेऊन रेल्वे अधिका-यांसोबत चर्चा करण्यात येईल. याबाबत मार्ग काढण्यासाठी व गाडी येण्याअगोदर सेन्सर गेटला लावण्याबद्दल रेल्वेला सूचना करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयास येईल.

उपस्थितांनी वेतनवाढीबाबत मुद्दा उपस्थित केला. तर राज्य सरकारने कुशल, अर्धकुशल व अकुशल संवर्गातील कामगारांना मंजूर केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त वेतन या प्रकल्पात अदा करण्यात येते.

उपस्थितांनी ग्रामपंचायत कराबाबत सूचना केलेली आहे. तर शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्णयाप्रमाणे ग्रामपंचायत कर भरण्यात येईल.

बैठकीत आरोग्य सुविधा, औषधोपचाराबाबत सूचना करण्यात आल्या. तर आम्ही काही दिवसातच आरोग्य शिबिर आयोजित करणार आहोत.

सीएसआर निधीतंर्गत आम्ही काही सामाजिक कामे केली, त्याची उपस्थितींतांनीसुध्दा नोंद घेतलेली आहे. काहींनी परिसरात अत्याधुनिक हॉस्पिटल बांधण्याची सूचना केली. तर प्रकल्प प्रशासनाची विनंती आहे की, आपण प्रकल्प बाधित गावातील लोकांनी त्यांच्या मागण्या लेखीस्वरुपात सादर करण्यात याव्यात. त्याबाबत प्राधान्य ठरविण्यात यावे. त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन निश्चितच पुढील कार्यवाही करेल. हे प्रकल्प व्यवस्थापनाचे अभिवचन आहे. जर त्यात थोडा जास्त खर्च झाल्यास कंपनी तो खर्च करेल.

त्यांनी सांगितले की, अल्ट्राटेक सिमेंट परिसराचा शाश्वत विकास (Sustainable Development) करण्यास बांधिल आहे. प्रकल्पासाठी रोज दोनशे ट्रक्स येणार आहेत. त्यामुळे आम्ही प्रदूषण नाकारत नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, डस्टच्या तक्रारीबाबत उद्याच त्या गावात मॉनिटरिंग करण्यात येईल. ज्यांनी तक्रारी केल्या, त्यांच्या घरात मॉनिटरिंग करण्यात येईल. तेथे मानदंडापेक्षा जास्त असल्यास त्याबाबत उपाययोजना करण्यात येईल. परिसरात जे प्रदूषण होत आहे, त्यात अल्ट्राटेक बरोबरच इतरही घटकांचा, कंपन्यांचा समावेश आहे.

येथे एका उपस्थितानी वीजपुरवठ्याबाबत तक्रार केली. तर हा विषय कंपनीकडून सोडविण्यात येईल. येथे होटगी स्टेशन व हिपळे ही दोन मोठी गावे व इतर गावे आहेत. आपण एकत्रित प्राधान्य ठरवून सामाजिक कामांची यादी देण्यात यावी. त्याबाबत निश्चितच विचार करण्यात येईल.

कंपनीने पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी २५ कोटी रुपये राखीव ठेवलेले आहेत.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणीत ब-याच स्थानिकांनी आपले विचार, सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. अजूनही कोणालाही सूचना, आक्षेप नोंदिवण्याचे असल्यास ते लेखी स्वरुपात सादर करु शकतात. स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना प्रकल्प प्रशासनाने उत्तर दिलेले आहे. ही जनसुनावणी प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पामुळे होणा-या संभाव्य पर्यावरणीय आघातांसाठी होती. ब-याच शेतक-यांनी पीकांवर, शेतात होणा-या प्रदूषणाबाबत आक्षेप नोंदविलेला आहे. त्याची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येईल व सदरहू इतिवृत्त सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप यांच्या सोबत शासनास सादर करण्यात येतील. ब-याच उपस्थितांनी पर्यावरणाखेरीज इतर स्थानिक मुद्दे मांडले. तरी कंपनी प्रशासनास सूचना करण्यात येते की, याबाबत कंपनी प्रशासनाने बैठक बोलावून त्याबाबत सकारात्मक व सहमतीचा मार्ग स्विकारावा. बैठकीत आरोग्यविषयक मुद्दे, कंपनीच्या उत्पादनामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्यावर झालेला परिणाम उपस्थित करण्यात आलेले आहे. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त ४४ लेखी निवेदने/पत्रे/तक्रार अर्ज सोबत जोडलेली आहेत.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

(निखिल मोरे)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सोलापूर

(रविंद्र आंधळे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

(दादासाहेब कांबळे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर